ज्ञानवर्धिनी संस्थेचे

# सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय, शहापूर

## महिला विकास कक्ष

---

# महिला केंद्रित काव्य वाचन स्पर्धा

## अहवाल

शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष , महिला विकास कक्ष (WDC) आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने **'महिला केंद्रित काव्य वाचन स्पर्धेचे' आयोजन करण्यात** आले. या स्पर्धेची उद्दिष्ट्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचन, चिंतन व अभिव्यक्ती कौशल्य विकसित करणे, महिलांविषयक साहित्य, विचारवंत व लेखनाची ओळख करून देणे, आणि विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वक्तृत्व व सादरीकरण क्षमता वाढवणे ही होती. या स्पर्धेस परीक्षक म्हणून डॉ. अश्विनी ओव्हाळ व प्रा. सरला कातकाडे या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.अनिल सिंह यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला विकास कक्ष समन्वयक डॉ. सीमा परटोले यांनी केले.

काव्यवाचन स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात महिला विकास कक्षाच्या सदस्या डॉ. अश्विनी ओव्हाळ यांच्या 'मोगरा' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अनिल सिंह यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रमुख परीक्षिका डॉ. अश्विनी ओव्हाळ व प्रा. सरला कातकाडे यांनी महिला केंद्रित कविता या विषयाचे महत्त्व,  काव्यवाचन कसे करावे? काव्य वाचनाचे विविध नियम या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.  सदर स्पर्धेत महाविद्यालयातील १५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अनिल सिंह, उपप्राचार्य डॉ. एस. गायकवाड, IQAC समन्वयक प्रो. डॉ. एस. वाघमोडे, WDC समन्वयक डॉ. सीमा परटोले, मराठी विभाग प्रमुख डॉ. राजू शनवार, WDC सदस्य डॉ. अश्विनी ओव्हाळ, प्रा. निशीगंधा जगे, प्रा. अर्चना घनघाव, प्रा. सरला कातकाडे, प्रा. स्वाती फर्डे, प्रा. मोनिका बांगर आणि प्रा. स्वाती जाधव यांनी विशेष मेहनत घेतली. या स्पर्धेच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.स्वाती जाधव यांनी केले. मराठी विभागातील सहाय्यक प्राध्यापक बंडू बिन्नर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गायनाने झाली.